अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.८९/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/९०२३दि.२९/१०/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/८९/२०२४

श्री.अशोक भानुदास कदम
साडेसतरा नळी रोड, भागीरथीनगर
स.नं.२०९, सुभाष मंडप डेकोरेटर्स,
हडपसर, पुणे-४११०२८

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.अशोक भानुदास कदम, साडेसतरा नळी रोड, भागीरथीनगर, स.नं.२०९, सुभाष मंडप डेकोरेटर्स, हडपसर, पुणे-४११०२८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.३०/५/२०२४ (आ.क्र.४०२३, दि.१४/६/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. मूळ अर्ज हडपसर क्षे.कार्यालयाकडून प्राप्त आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३१३४, दि.२८/६/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ३०/५/२०२४ | १४/६/२०२४ | १३/७/२०२४ | २८/६/२०२४ | ० |

माहिती मिळाली नाही म्हणून १९(१) प्रमाणे प्रथम अपिल. RTI अर्ज वर्ग दि.१३/६/२०२४ रोजी केला. हडपसर क्षे.कार्या. ३ वर्षापेक्षा सेवकांची तपशीलवार सेवा कार्डच्या फोटो कॉपी मिळाव्यात, असे नमूद करुन दि.०१/१०/२०२४ रोजी (आ.क्र.१२२३७ दि.०१/१०/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १/१०/२०२४ | १/१०/२०२४ | २६/०७/२०२४ | नाही | २ म. ३ दि. विलंब. निवेदन दिले नाही. सुनावणी दरम्यान नमूद केले. |

सदर अपिलाची सुनावणी दि.२२/१०/२०२४ रोजी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/८३४२, दि.१५/१०/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. प्रशासकीय कारणामुळे सुनावणीची वेळ सकाळी ११.०० वा. ऐवजी दु.३.०० अशी करण्यात आली आहे. याबाबत जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/८४५६, दि.१७/१०/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी सुनावणीस उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे अनुपस्थित होते. अपिलाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२१/१०/२०२४ रोजी लेखी म्हणणे सादर केले आहे.

## विवेचन

माहिती मिळाली नाही म्हणून १९(१) प्रमाणे प्रथम अपिल. RTI अर्ज वर्ग दि.१३/६/२०२४ रोजी केला. हडपसर क्षे.कार्या. ३ वर्षापेक्षा सेवकांची तपशीलवार सेवा कार्डच्या फोटो कॉपी मिळाव्यात, असे नमूद करुन दि.०१/१०/२०२४ रोजी (आ.क्र.१२२३७ दि.०१/१०/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मूळ अर्ज दि.३०/५/२०२४ (आ.क्र.४०२३, दि.१४/६/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. मूळ अर्ज परिमंडळ क्र.४ कडे (आ.क्र.८६९ दि.३०/५/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. परिमंडळ क्र.४ ने हडपसर क्षे.कार्या.कडे (आ.क्र.२८३० दि.३/६/२०२४) वर्ग केला आहे. हडपसर क्षे.कार्यालयाने जा.क्र.२१०६ दि.१३/६/२०२४ (आ.क्र.४०२३ दि.१४/६/०२४) रोजी आस्थापना विभागाकडे मुद्दा क्र.१(१) ची माहितीसाठी वर्ग केला आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सेवकांची माहितीसाठी जा.क्र.२६७८ दि.१८/६/२०२४ रोजी वर्ग करण्यात आलेला आहे.

मूळ अर्जात हडपसर-मुंढवा क्षे.कार्या. येथील सर्व विभागातील तीन वर्षापासून जास्त वर्ष कार्यरत असलेल्या सर्व वरिष्ठांपासून ते शिपाईपर्यंत सर्व कर्मचारी अशा सर्वांचे खालील रेकॉर्ड कॉपी मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३१३४, दि.२८/६/२०२४ अन्वये २५ प्रतिंसाठी रु.५०/- शुल्क भरणेबाबत कळविण्यात आले आहे.

हडपसर मुंढवा क्षे.कार्यालयाकडील ३ वर्षापेक्षा जास्त सेवा करणाऱ्या सेवकांची माहिती मागितली आहे. अपेक्षित माहिती प्राप्त झाली नसल्याने शुल्क भरणा केलेला नाही. आवश्यक माहितीवेळेत प्राप्त न झाल्याने अपिल  करण्यास विलंब झाल्याचे सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी नमूद केले.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज परिमंडळ क्र.४ यांचेकडे सादर केला आहे. परिमंडळ क्र.४ कडून हडपसर-मुढवा क्षे.कार्या. यांचेकडे व क्षेत्रिय कार्यालयाने मुद्दा क्र.१(१) ची माहिती उपलब्ध करुन देणेसाठी दि.१३/६/२०२४ रोजी (आ.क्र. ४०२३, दि.१४/६/२०२४) रोजी आस्थापना विभागाकडे वर्ग केला आहे. आस्थापना विभागाने जा.क्र.३१३४ दि.२८/६/२०२४ रोजी २५ पानांसाठी रु.५०/- शुल्क भरणेबाबत कळविले आहे. शुल्क विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. तसेच, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील माहितीसाठी जा.क्र.२६७८ दि.१८/६/२०२४ ने अर्ज वर्ग करण्यात आला आहे. शुल्क आकारणी व अर्ज वर्ग करणे या दोन्ही प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण केल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी यांचे दि.२१/१०/२०२४ रोजीचे लेखी म्हणण्यात नमूद केले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान अपिल अर्ज करण्यास झालेला विलंबाबतचे कारण मान्य करुन विलंब क्षमापित करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेत वर्ग १ ते ३ च्या अधिकारी/सेवकांच्या बदल्या करण्यात येतात. वर्ग ४ मधील सेवकांच्या बदल्या होत नाही. मूळ अर्जात मुद्दा क्र.१(१) चे माहितीसाठी शुल्क भरणेबाबत वेळेत कळविण्यात आले आहे. शुल्क भरणेपूर्व माहितीचे अवलोकन करणे शक्य आहे. हडपसर-मुंढवा क्षे.कार्या.कडील ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीतील वर्ग १ ते ३ मधील सेवकांची माहिती तयार करुन अवलोकनार्थासाठी देऊन माहिती शुल्क आकारणी करुन देणे शक्य आहे. मूळ अर्जातील मुद्दा क्र.१(२), २, ३,४ च्या माहितीसाठी हडपसर क्षे.कार्यालयाकडे स्वतंत्र अर्ज दाखल करावा, असे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी मूळ अर्जातील मुद्दा क्र.१(१) ची माहिती अवलोकनार्थ देवून आवश्यक शुल्क आकारणी करुन आदेश प्राप्तीपासून ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

P. Patil
29.10.24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.